दि. ०१/०४/२०२३

लोकमत पृ. पान क्र.३

# पैसे दुप्पटच्या आमिषाने गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : एका दिवसात पैसे दुप्पट होण्याच्या लोभाने भाईंदरमधील एका व्यापाऱ्याने स्वतःचे ३० लाख रुपये गमावल्याची घटना घडली. याप्रकरणी भाईंदर पोलिसांनी एकाला अटक केली.

भाईंदर, पश्चिमेस राहणारे रवी कांतिलाल मेहता (वय ४५) हे जमीन खरेदी - विक्री व स्टीलचा व्यवसाय करतात. जमीन खरेदी - विक्री व्यवसायात जमिनीच्या कागदपत्रांचे काम भूषण मांडवकर करतो. भूषण याने मेहतांना त्यांच्या मित्राने आणलेल्या योजनेची माहिती दिली. ५ लाख रुपये भरल्यास ते एक 'पे बाय नियर वॉलेट' नावाचे स्पेन देशाचे वॉलेट उघडून त्यात गुंतवणूक केली जाते. त्यामध्ये नंतर रोखीने २५ लाख भरावे लागतात. ती रक्कम भरल्यास दुसऱ्या दिवशी ५४ लाख रुपये मिळतात, अशी योजनेची माहिती भूषण याने मेहतांना दिली. भूषणच्या सांगण्यानुसार मेहतांनी करण व राहुल यांना ५ लाख रुपये दिले. दोघांनी मेहता यांचे वॉलेट अकाऊंट उघडल्यानंतर मेहता यांच्या त्या वॉलेट खात्यात साडेतीन लाख रुपये जमा झाले.

झटपट भरपूर पैसे मिळत असल्याचे पाहून मेहतांनी त्या दोघांना रोखीने २५ लाख रुपये दिले. दोन दिवसात पैसे खात्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. मात्र, पैसे न आल्याने मेहतांनी करण व राहुल यांना विचारणा केली असता दोघांनी चालढकल सुरू केली. भाईंदर पोलिसांनी करण रजोरा याला अटक केली असून, राहुल गायकवाड याचा शोध सुरू आहे.

लोकसत्ता पान क्र. ९

# आर्थिक गुन्हेगारीत महाराष्ट्र चौथ्या स्थानावर

## केंद्रीय गृह मंत्रालयाचा अहवाल

**अनिल कांबळे, लोकसत्ता**

**नागपूर :** आर्थिक गुन्हेगारीचे देशात सुमारे पावणेदोन लाखांवर प्रकरणे नोंदवली गेली असून आर्थिक गुन्हेगारीत महाराष्ट्राचा देशात चौथा क्रमांक आहे. पहिल्या क्रमांकावर राजस्थान तर दुसऱ्या क्रमांकावर तेलंगणा राज्य आहे. आर्थिक स्वरूपाच्या गुन्हेगारीत सर्वाधिक पांढरपेशे अडकल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्रालयाने नुकत्याच सादर केलेल्या अहवालातून समोर आली आहे.

आर्थिक स्वरूपाच्या गुन्ह्यांमुळे राज्याची अर्थव्यवस्था खिळखिळी होत आहे. यामध्ये फसवणूक, हवाला, लाचखोरी, बँकांचे कर्ज बुडवणे, भ्रष्टाचार, अपहार, गैरव्यवहार, वेगवेगळी आमिष दाखवून आर्थिक फसवणूक आणि आर्थिक घोटाळा करणे, अशा गुन्ह्यांचा समावेश आहे. आर्थिक गुन्ह्यात सर्वाधिक पांढरपेशा आरोपींचा समावेश असतो. वेगवेगळी आमिष दाखवून सामान्य नागरिकांना जाळ्यात ओढून पैसे उकळण्यासाठी गुन्हेगार प्रयत्न करीत असतात. अनेक जण अधिक आर्थिक मोबदला मिळवण्याच्या नादात आर्थिक गुन्हेगारांच्या जाळ्यात फसतात. गुंतवणुकीच्या रकमेवर ३० ते ४० टक्के व्याज किंवा दामदुप्पट परताव्याच्या नावावर सर्वाधिक गुंतवणूकदार फसतात. गुन्हेगार विविध योजना आखून गुंतवणूक करण्यास भाग पाडतात.

आर्थिक गुन्हेगारीचे देशभरात जवळपास पावणेदोन लाख गुन्हे दाखल आहे. त्यात सर्वात जास्त गुन्हे राजस्थान (२४ हजार), तेलंगणा (२१ हजार), उत्तरप्रदेश (२० हजार) तर महाराष्ट्र (१६ हजार) प्रकरणे दाखल झाली आहेत.

राज्यात प्रत्येक आयुक्तालय आणि जिल्ह्यात आर्थिक फसवणुकीच्या तपासासाठी विशेष आर्थिक सेल (इकोनॉमिक्स ऑफिन्स विंग) तयार केले आहेत.

### पोलिसांच्या भूमिकेमुळे तक्रारदारांचा हिरमोड

आर्थिक गुन्ह्यांची नोंद झाली की अनेकदा पोलिसांवर राजकीय दबाव असतो. तसेच आर्थिक गुन्ह्यांचा तपास अतिशय मंदगतीने सुरू असतो. पोलीस अधिकारीसुद्धा या तपासात रस दाखवत नाहीत. गुंतवणूकदारांना गुंतवलेली रक्कम परत मिळण्याची शक्यता नसते. अनेकदा पोलीस आरोपींशी संगनमत करीत असल्याचे प्रकार समोर आल्यामुळे तक्रारदारांचा हिरमोडसुद्धा होतो.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ.पान क्र.1 दि. 01/05/2023

# मीरा-भाईंदरमधील अनधिकृत शाळांचा शोध सुरू

## बेकायदा आढळल्यास बंद करण्याचे शिक्षणाधिकाऱ्यांचे आदेश

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेने शहरात अनधिकृत शाळा सुरू आहेत का, याची तपासणी करण्यासाठी सर्वेक्षण सुरू केले आहे. गेल्या वर्षी महापालिका शिक्षण विभागाने कोणत्याही परवानगीशिवाय सुरू असलेल्या ७ शाळांची यादी प्रसिद्ध केली होती. त्यातील काही शाळांना दंड आकारण्यात आला होता, तर काही शाळा बंद केल्या होत्या. त्यातील काही शाळा अद्याप सुरू असल्याचे सांगितले जात आहे.




### कारवाई करण्यासाठी सर्वेक्षण सुरू

शहरात महापालिकेच्या ३६ शाळा आहेत. तर खासगी व अनुदानित अशा ३७० नोंदणीकृत शाळा आहेत. बेकायदा शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेणे धोक्याचे आहे. या शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्य विभाग आणि सरकारी परीक्षांना बसण्याची परवानगी मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे शिक्षण विभागाने अनधिकृत शाळांवर कारवाई करण्यासाठी सर्वेक्षण सुरु केले आहे. शिक्षण विभागाने नागरिकांनाही अनधिकृत शाळा असल्याची माहिती असल्यास ०२२-२८१४९०४२ या हेल्पलाइन क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

मीरा-भाईंदर शहरात दरवर्षी अनधिकृत शाळांचा शोध घेऊन यादी प्रसिद्ध केली जाते. यावर्षीही पालिकेने शहरातील अनधिकृत शाळांचा शोध घेण्यासाठी शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांची पाच पथके तयार केली आहेत. या पथकाला सर्वेक्षण करून शिक्षण विभागाला अहवाल सादर करायचा आहे. शिक्षण विभागाच्या पथकांनी अनधिकृत शाळांना शोधून काढण्यासाठी परिसरनिहाय सर्वेक्षण सुरू केले आहे. त्यांच्या संबंधित अधिकार क्षेत्रातील संस्था आणि ज्या शाळा बेकायदा कार्यरत असल्याचे आढळेल, त्यांना तत्काळ बंद करण्याचे आदेश दिले जातील, असे शिक्षणाधिकारी सोनाली माटेकर यांनी सांगितले. कलम १८ (५) अन्वये १ लाखाचा दंड ठोठावण्याव्यतिरिक्त शिक्षण कायदा २००९ आणि शाळा बंद करण्याच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांसाठी अतिरिक्त दैनंदिन दंड, शिक्षण विभागाला भादंसंहितेअंतर्गत फौजदारी कार्यवाही करण्याचा अधिकारही दिला आहे.

# शहरात आज महाराष्ट्रदिनी सांस्कृतिक कार्यक्रम

**मीरारोड :** मीरा भाईंदर महापालिकेतर्फे १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ वा. काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम, तसेच भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सकाळी ८.३० वा. पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. नंतर महापालिका मुख्य कार्यालयातील प्रांगणात ध्वजवंदनाचा कार्यक्रम सकाळी ८.४५ वा. आयुक्त दिलीप ढोले यांच्या हस्ते होणार आहे. भारतरत्न स्व. लता मंगेशकर नाट्यगृह येथे सकाळी १०.३० वा. सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहेत. विशेष म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रमात पालिका कर्मचारी, अधिकारी नृत्य व गाणे सादर करणार आहेत.

पुढारी पान क्र.3

# मॉडेलिंग करणाऱ्या मुलीकडून वेश्याव्यवसाय

## एजंटला घेतले ताब्यात, मुलीची सुटका

**मिरारोड :** मिरा भाईंदर परिसरात मॉडेलिंग आणि फोटोशूटचे काम करणाऱ्या मुलींकडून आरोपी एजंट वेश्याव्यवसायाचा घृणास्पद व्यवसाय करत होता. गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी एजंटला ताब्यात घेऊन पीडित मुलीची सुटका केली आहे.

मिरारोड पोलीस ठाणे हद्दीमध्ये शिवार गार्डन जवळ एक एजंट ग्राहकांच्या मोबाईल व्हॉट्सअॅपवर मुलींचे फोटो पाठवून वेश्या व्यवसायासाठी मुलींचा पुरवठा करत आहे. तो शिवार गार्डन जवळ येणार असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक समीर अहिराव यांना माहिती मिळाली. त्यानंतर बोगस ग्राहक पाठवून माहिती मिळवली. त्यानंतर शिवार गार्डन जवळ छापा टाकून एका एजंटला ताब्यात घेऊन वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून पीडित मुलीची सुटका केली. अनेक महिन्यांपासून हा एजंट मॉडेलिंग करणाऱ्या मुलींना आणत होता.

Scanned with CamScanner

दि.०१/०५/२०२३

पुढारी पृ. पान क्र. १

# रिक्षात हरवलेले दागिने पोलिसांनी केले परत

## ...अन महिलेला रडू कोसळले

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड रेल्वे स्थानक येथे महिला गावी जाताना रिक्षात दागिने विसरली. नयानगर पोलिसांनी रिक्षातील हरवलेले दागिने शोधून चार दिवसांत परत केले. महिला ही गावी असल्यामुळे तिच्या पतीने तिला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे जप्त केलेले दागिने दाखवताच त्या महिलेला रडू कोसळले; त्यावेळी त्या महिलेने पोलिसांचे आभार मानले.

भाईंदर पूर्वेच्या रामदेव पार्क येथे राहणारे रविंदर सिंग यांची पत्नी त्यांच्या मूळगावी पंजाबला जाणार होती. त्यासाठी त्यांनी २६ एप्रिल रोजी पत्नी व मुलांना मिरारोड स्थानक येथे सोडण्यासाठी रामदेव पार्क येथून रिक्षा पकडली.

मिरा रोड रेल्वे स्थानकावर पोहोचल्यावर रविंदर सिंग आणि त्याचे कुटुंब रिक्षातून खाली उतरले. रिक्षातून सामान उतरवल्यानंतर रिक्षा निघून गेली. त्यावेळी रिक्षामध्ये रविंदर यांच्या पत्नीची दागिन्यांनी भरलेली कापडी पिशवी रिक्षामध्येच राहिली. त्यानंतर स्टेशन परिसरात बराच वेळ ऑटो रिक्षा शोधूनही रविंदर यांना रिक्षा मिळाली नाही. तसेच ते पत्नीला घेऊन तो बोरिवलीला गेले. रेल्वे स्टेशनवर ट्रेनने पत्नीला गावी पाठवल्यानंतर त्यांनी नयानगर पोलीस ठाण्यात दागिने हरवल्याची तक्रार दाखल केली. नयानगर पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजच्या मदतीने ४ दिवस रिक्षाचा तपास केला. रविवारी रिक्षात हरवलेले दागिने पोलिसांना मिळाले. पोलिसांनी रविंदर सिंग याला हरवलेले दागिने परत केले. नयानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वनकोटी यांनी रविंदर सिंग यांना दागिने परत देताना त्यांच्या पत्नीला व्हिडिओ कॉल करून हरवलेल्या दागिन्यांची माहिती देण्यास सांगितले. पत्नीला दागिने दाखवले त्यावेळी हरवलेले दागिने सापडल्याच्या आनंदात रविंदर सिंग यांच्या पत्नीला अश्रू अनावर झाले. त्यांनी गावावरून आल्यानंतर नयानगर पोलिसांचे आभार मानण्यासाठी येणार असल्याचे सांगितले. रविंदर सिंग यांनी दागिने परत घेताना नयानगर पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले.

पुढारी पृ. पान क्र. 3

# वसई कृषी उत्पन्न बाजार समितीवर बविआची सत्ता

## एका जागेवर भाजपची वर्णी

**वसई / खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसई कृषी उत्पन्न बाजार समितीवर पुन्हा एकदा वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीचा झेंडा फडकला आहे. आज झालेल्या ११ जगाच्या निवडणुकीत सर्वच जागा बहुजन विकास आघाडीने जिंकल्या. निवडणुकीपूर्वी ६ जागा बिनविरोध आल्या होत्या त्यात ५ जागा बहुजन विकास आघाडी आणि एका जागेवर भाजप प्रणित उमेदवार निवडून आला होता. या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीच्या विरोधात सर्व पक्षाची आघाडी झाली होती. तरीही याठिकाणी पुन्हा बहुजन विकास आघाडीने बाजार समिती आपल्याकडे राखण्यात यश मिळविले आहे.

वसई विरारमध्ये सद्या महानगरपालिका, पंचायत समिती अनेक सेवा संस्था , सहकार क्षेत्रातील बँका यावर बहुजन विकास आघाडीचे वर्चस्व आहे. वसई कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकि पूर्वी हि निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु राज्यात झालेले सत्तांतर यामुळे भाजपने इतर पक्षांना बरोबर घेऊन निवडणुकीत भाजपचे राजेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीला सामोरे जाण्याचे धोरण अंगिकारल्याने हि निवडणूक झाली. निवडणुकी पूर्वी बहुजन विकास आघाडीने ५ जागा जिंकून निवडणुकीत आघाडी घेतली होती. तर एक जागा भाजपला मिळाली होती. आज ११ जागा साठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी संध्याकाळी ५.३०. वाजता सुरु झाली आणि सात वाजता संपली.या मध्ये बहुजन विकास आघाडीने ११ च्या ११ जागा जिंकून विरोधकांना बाजार समितीतून लांब ठेवले आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून एकनाथ शिंदे यांची शिवसेना, भाजप, श्रमजीवी संघटना, शिवसेना असे विरोधी पक्ष एकत्र आले होते. परंतु कार्यकर्त्यांचे जाळे आणि शिस्तबद्ध प्रचार आणि सहकार, ग्रामपंचायत क्षेत्रात असलेले बहुजनचे प्राबल्य या जोरावर बहुजन ने हि निवडणूक सहज जिंकली आहे.

> कृषी उत्पन्न बाजरी समितीच्या इमारतीचे काम जागे अभावी रखडले होते, ते वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका, राज्य शासन आणि पणन महामंडळ यांच्या माध्यमातून मार्गी लावणार आहोत. इमारत झाल्यानंतर त्याचा फायदा येथील व्यापारी, शेतकरी यांना होणार आहे.
>
> -अशोक कोलासो,
> नवनिर्वाचित सदस्य,
> बहुजन विकास आघाडी

Scanned with CamScanner

# मुंबईचा हात आखडता

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

- मिरा-भाईंदरसाठी दीड एमएलडी पाणी मंजूर
- मात्र केवळ अर्धा एमएलडी पाणीपुरवठा

मिरा-भाईंदरकरांना ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. स्टेम व एमआयडीसीकडून मंजूर कोट्याच्या तुलनेत कमी पाणीपुरवठा केला जात असल्याने ही समस्या उद्भवल्याचे आतापर्यंत सांगितले जात होते. मात्र आता मुंबई महापालिकाही या पाणीटंचाईला कारणीभूत असल्याची बाब समोर आली आहे. मिरा-भाईंदरला मुंबई महापालिकेकडून दीड एमएलडी पाणी मंजूर असले, तरी मागील काही महिन्यांपासून केवळ अर्धा एमएलडी पाणीपुरवठा मुंबई महापालिकेकडून केला जात आहे. हा पुरवठा सुरळीत करण्यासाठी मिरा-भाईंदर पालिकेने पाठपुरावा करावा, अशी मागणी होत आहे.

मिरा-भाईंदरमध्ये अनेक इमारती म्हाडामार्फत उभारण्यात आल्या आहेत. शहरातील नागरिकांना आधीच पाणी अपुरे पडत असताना, म्हाडाच्या या इमारतींना पाणीपुरवठा करण्याचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे. त्यामुळे मिरा-भाईंदरमधील म्हाडाच्या इमारतींसाठी मुंबई पालिकेने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी मिरा-भाईंदर महापालिकेने २०१३ साली केली होती. त्यानुसार २०१४ साली मुंबई महापालिकेने मिरा-भाईंदरला १.५ एमएलडी पाणीपुरवठा करण्यास मंजुरी दिली. मात्र प्रत्यक्षात मागील अनेक वर्षांपासून हे पाणी दिले जात नव्हते.

त्यानंतर, अखेर मागील वर्षी पाणीपुरवठा मंत्र्यांच्या आदेशानंतर मुंबई महापालिकेने हा पाणीपुरवठा सुरू केला. मात्र मागील काही महिन्यांपासून केवळ अर्धा एमएलडी इतकाच पाणीपुरवठा मिरा-भाईंदर शहराला केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. मागील काही दिवसांपासून स्टेम व एमआयडीसीकडून मिरा-भाईंदर महापालिकेला मंजूर कोट्याच्या तुलनेत सुमारे २० एमएलडी कमी पाणी पुरवले जात आहे. परिणामी पालिकेमार्फत अधिक कालावधीनंतर शहराला पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. मिरा-भाईंदरच्या पाणीटंचाईला स्टेम व एमआयडीसी कारणीभूत असल्याचे आतापर्यंत सांगितले जात होते. परंतु आता पाणीटंचाईचे हे कारण नव्याने समोर आले आहे.

### मुंबईकडे पाठपुरावा करावा

मुंबई पालिकेने पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, यासाठी मिरा-भाईंदर महापालिकेने पाठपुरावा करावा, अशी मागणी भाजपचे माजी नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील यांनी केली आहे.

# रेल्वे स्थानकात 'परिवहन'चे आगार

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

### मिरा-भाईंदर पालिकेकडून डीपीआर तयार

मिरा रोड व भाईंदर रेल्वे स्थानक परिसरात परिवहनच्या बस उभ्या करण्यासाठी लवकरच हक्काची जागा उपलब्ध होणार आहे. सध्या दोन्ही रेल्वे स्थानकांजवळ जागेअभावी रस्त्यावरच बस उभ्या केल्या जात आहेत. परिणामी, मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. प्रवाशांची संख्या लक्षात घेता बसस्टँडदेखील अपुरा पडत असल्याने नागरिकांची गैरसोय होते. त्यामुळे दोन्ही रेल्वे स्थानकांच्या परिसरात बस उभ्या करण्यासाठी आगार उभारण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. त्यासाठीचा डीपीआरदेखील नुकताच तयार करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर महापालिकेच्या विकास आराखड्यात मिरा रोड रेल्वे स्थानकालगत बस आगाराची आरक्षित जमीन आहे. या जागेत मासळी बाजार उभारल्याने बस उभ्या करण्यासाठी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावरच बेस्ट, मिरा-भाईंदर, नवी मुंबई व ठाणे महापालिकेच्या परिवहन सेवेच्या बस उभ्या केल्या जातात. हा रस्ता अरुंद असल्यामुळे बस वळवण्यात अडचणी येतात. परिणामी वाहतूककोंडी होते. भाईंदर पश्चिमेला आधीच रस्ता अरुंद असताना, त्यावरच बस उभ्या केल्या जात असल्याने अशीच परिस्थिती आहे.

मिरा रोड व भाईंदर पश्चिम रेल्वे स्थानक येथून बसने ठाणे, मुंबई व शहरातील विविध परिसरात जाण्यासाठी नागरिक येत असल्यामुळे मोठी गर्दी असते. त्यामुळे येथील बसस्टॉपदेखील बिनकामी ठरत असून, भर उन्हात व पावसात प्रवाशांना उभे राहावे लागते. अपुऱ्या जागेमुळे बसचालक व इतर वाहनचालकांमध्ये वादही उद्भवत आहेत. या पार्श्वभूमीवर दोन्ही रेल्वे स्थानकांच्या परिसरात बस उभ्या करण्यासाठी हक्काची जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने बस आगार उभारण्याचा निर्णय मिरा-भाईंदर महापालिकेने घेतला आहे. या कामाचा साडेबावीस कोटी रुपये खर्चाचा सविस्तर प्रकल्प अहवाल पालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने नुकताच तयार केला आहे. या कामासाठी सरकारकडून निधी मिळवण्यासाठी पालिका प्रशासन प्रयत्नशील आहे. अन्यथा हे काम बीओटी तत्त्वावर पूर्ण केले जाणार असल्याची माहिती पालिका शहर अभियंता दीपक खांबित यांनी दिली.

### मिरा रोड बस आगार

- मिरा रोड रेल्वे स्थानकालगत मासळी बाजाराच्या जागेवर तळ अधिक चार मजल्याची इमारत
- तळमजल्यावर बस आगार, तर वरच्या मजल्यांवर मासळी बाजार
- येथील आगारात दहा बस उभ्या करता येणार आहेत
- यावर सुमारे साडेनऊ कोटींचा खर्च

### भाईंदर पश्चिम बस आगाराची वैशिष्ट्ये

- भाईंदर पश्चिमेला रेल्वे स्थानकालगत परिवहन विभागाची आरक्षित जागा, आगारासाठी उपलब्ध करून देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश
- येथे तळ अधिक दहा मजल्याची इमारत उभारली जाणार
- तळमजल्यावर बस आगार व वरील मजल्यावर बाजार गाळे
- आगारात २३ बससाठी जागा, १३ कोटी रुपयांचा खर्च



# फेरीवाल्यांविरोधात आयुक्तांची मोहीम

विरार, ता. ३० (बातमीदार) : वसई-विरारला एका बाजूने अनधिकृत बांधकामांनी घेरले असतानाच अनधिकृत फेरीवाल्यांनी पदपथ अडवल्याने नागरिकांना रस्त्यावरून चालणेही मुश्किल झाले होते. अखेर आयुक्तांनी नालासोपारा येथील फेरीवाल्यांविरोधात कारवाईचा बडगा उगारला. नालासोपारामधील कारवाईनंतर त्यांनी आपला मोर्चाचे विरारमध्ये वळवला आहे.

विरार पूर्व-मनवेलपाडा ते कारगिल नगर रस्त्यावरील अनेक टपऱ्या आणि हातगाड्या भुईसपाट करण्यात आल्या. अतिक्रमण विभागाचे उपायुक्त अजित मुठे आणि प्रभारी सहायक आयुक्त सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही धडक मोहीम राबवण्यात आली.

महापालिका हद्दीत सध्या मोठ्या प्रमाणात फेरीवाले वाढू लागले आहेत. त्यांना राजकीय तसेच ठेका घेणाऱ्यांचा पाठिंबा असल्याचे बोलले जात आहे. ठेका घेणारे रस्त्यावर अनधिकृत फेरीवाले बसवून त्यांच्याकडून वसुली करत आहेत. तसेच पालिका हद्दीत आता नव्याने महापालिका प्रशासनाला अंधारात ठेवून ठिकठिकाणी आठवडा बाजारही भरवला जात आहे. त्यातून लाखोंची कमाई करण्यात येत आहे. त्याकडे पालिकेचे मात्र दुर्लक्ष होताना दिसत आहे. विरार पूर्व-मनवेलपाडा ते कारगिल नगर रस्त्यावर मागील काही महिन्यात फेरीवाल्यांची संख्या प्रचंड वाढली आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. १ — दि. ०७/०५/२०२३

# मीरा-भाईंदरकरांची टोलनाक्यापासून सुटका कधी?

## राजकीय नेत्यांचे दुर्लक्ष, नागरिकांची लूट सुरूच

नामदेव काशिद

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहर हे मुंबईच्या वेशीला लागून आहे. शहरातील नागरिकांना मुंबईला जाण्यासाठी दहिसर चेकनाक्यावरून जावे लागते. दहिसर चेकनाक्यावर काही वर्षापासून टोलनाका आहे. या टोलनाक्यामुळे मीरा-भाईंदर शहरातील नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. तसेच आर्थिक तोटाही सहन करावा लागत आहे. टोलनाका बंद करण्यासाठी काही वर्षापासून नागरिक, सामाजिक संस्थांकडून मागणी होत आहे. परंतु टोलनाका बंद करण्यात येत नाही. त्यामुळे या टोलनाक्यापासून मीरा-भाईंदरकरांची सुटका कधी होणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. टोलनाक्यावरील आर्थिक वसुलीमुळे नागरिकांची लूट सुरू असतानादेखील राजकीय पुढाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध असल्यामुळे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. मीरा-भाईंदरकरांना मुंबईत जाण्यासाठी रेल्वेसेवावगळता दहिसर चेकनाका या एकमेव असलेल्या रस्त्याने जावे लागते. या मार्गावर दहिसर चेकनाका येथे टोलनाका असल्यामुळे मुंबईत येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांची संख्या जास्त असल्याने मोठी वाहतूक कोंडी होते. दहिसर टोलनाका येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागतो. वाहनचालकांना कधी कधी अर्धा तास, एक तास अडकून पडावे लागते.



यात इंधनाचा अपव्यय होतो. प्रवास खर्चात वाढ होते. तसेच प्रदूषणही वाढत आहे. याचा सर्वाधिक त्रास मीरा-भाईंदरकरांना मुंबईच्या दिशेने जाताना सहन करावा लागतो. या समस्येमुळे काही वर्षापासून शाळकरी विद्यार्थी, आजारी असलेले रुग्ण, नोकरदार, वयोवृद्ध नागरिक असे सर्वजण हैराण आहेत.

टोलनाका बंद करावा अथवा मीरा-भाईंदरच्या पुढे न्यावा, यासाठी विधानसभेत अनेकदा काही लोकप्रतिनिधींनी प्रश्न उपस्थित केला होता. परंतु याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून, नागरिकांची टोलवसुलीच्या नावावर लूट सुरू असल्याचे नागरिक सांगत आहेत. मीरा रोड येथे झालेल्या एका शासकीय कार्यक्रमात आ. गीता जैन यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर टोलनाक्यातून नागरिकांची सुटका करावी, अशी मागणी केली होती. परंतु उपमुख्यमंत्र्यांनी टोलनाक्याबाबत बोलण्याचे टाळले. त्यामुळे दहिसर टोलनाक्याची समस्या कधी सुटणार, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

- निवडणुका जवळ आल्या की, राजकीय नेत्यांकडून फक्त आश्वासने दिली जातात. टोलनाका स्थलांतरित करण्याचा मुद्दा राजकीय नेत्यांनी उपस्थित केला होता. प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या टोलनाक्याच्या वसुलीतून कोणता खर्च केला जात आहे, दरवेळेस या टोलनाका वसुलीला मुदतवाढ दिली जाते. तसेच टोलनाक्यावर नियमानुसार कोणतेही पिवळे पट्टे मारलेले नाहीत.
- टोलनाक्याच्या आजूबाजूलाच मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. तरीही कोणतेही काम केले जात नसून, टोलवसुलीच्या नावावर फक्त नागरिकांची लूट सुरू असल्याचा संताप नागरिकांनी व्यक्त केला आहे. सरकारने हा टोलनाका बंद करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner